AvianMedia

**Punya Nagari**
**Thursday, September 17th, 2009 (Mumbai)**
**Page No- 9**

# हरभजन निओ स्पोर्ट्सचा ब्रॅण्ड ॲम्बेसेडर



मुंबई, दि. १६ - निओ स्पोर्ट्स ब्रॉडकास्ट प्रायव्हेट लिमिटेडने भारतीय क्रिकेटपटू हरभजन सिंगची ब्रॅण्ड ॲम्बेसेडर म्हणून नियुक्ती केली असून निओ क्रिकेटवरील अखंड क्रिकेट धमाक्याचा प्रसार करण्याची जबाबदारी त्याच्यावर असेल. निओ स्पोर्ट्सबरोबरच्या या आपल्या निवडीबाबत हरभजन सिंग म्हणाला, 'निओ स्पोर्ट्सबरोबर त्यांचा 'ब्रॅण्ड ॲम्बेसेडर' म्हणून नाते जोडताना त्याला अतिशय आनंद होत आहे. दोघांचा ध्यास एकच आहे आणि तो म्हणजे क्रिकेट. प्रत्येक भारतीय क्रिकेट चाहत्यांच्या घरी ही वाहिनी क्रिकेट पोहोचवते. निओ क्रिकेटवरील मोसमाचा प्रसार करत असताना भारतातील या क्रिकेटवेड्या चाहत्यांपर्यंत पोहोचण्याचे एक माध्यम होत असल्याचा त्याला अतिशय आनंद आहे. ब्रॅण्ड ॲम्बेसेडर म्हणून हरभजन सिंग वाहिनीच्या प्रसार मोहिमेचे नेतृत्व करेल आणि त्यात कार्यक्रम, ऑन-ग्राऊंड आयोजने आणि वाहिनीवरील ऑन-एअर कार्यक्रमांमधील त्याचा सहभाग या गोष्टींचा समावेश असेल.